नि.दि.दावा क्र.३९१/२०१६
गजानन —वि— लक्ष्मण
**CNRNO.-MHBI0800-0828-2016**

## <u>नि.क्र. ३८ वरील आदेश</u>

( दि.०९.०२.२०२४ रोजी पारीत )

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी नि. २१ व ३० वरील आदेशाप्रमाणे राहुन गेलेली करावयाची दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, वादीने दि.१८.०३.२०२३ रोजी दावा दुरूस्ती प्रत दाखल केली आहे. तथापि, अनावधानाने दुरूस्ती करण्याचे राहुन गेले आहे, असे कथन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादीतर्फे अर्जावरच त्यांचे म्हणणे देवुन आक्षेप घेतला आहे.

३. दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे असे कथन आहे की, वादीने दि.१८.०३.२०२३ रोजी दावा दुरूस्ती प्रत दाखल केली आहे. तथापि, अनावधानाने दुरूस्ती करण्याचे राहुन गेले आहे. वादीने दावा दुरूस्ती प्रत दाखल केली आहे. अनावधानाने मुळ दाव्यात दुरूस्ती करण्याचे राहुन गेल्याचे दिसते. अर्जास संयुक्तिक कारण आहे. सदर कामी कालावधी वाढवुन दुरूस्ती करण्यास परवानगी दिल्यास सदर प्रकरणाचा गुणानुगुणावर निपटारा होण्यास मदत होईल. परवानगी नाकारल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचे उद्दिष्ठ साध्य करण्याकरीता वरील कारणांचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येतात.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. मुळ दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी दिलेला कालावधी वाढवुन दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादीने पुढील तारखेपर्यंत दुरूस्ती करावी.

( र.आ.सावंत )

दि.०९.०२.२०२४

सह दिवाणी न्यायाधिश(क.स्तर)
माजलगाव,जि.बीड.

## CERTIFICATE

" I  affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order"

| | |
|---|---|
| Dictated on | 09-02-2024 |
| Transscribed On | 09-02-2024 |
| Checked & signed on | 09-02-2024 |

Sd/-
( P.P.Andurkar )
Steno Gr-III,
Jt.C.J.J.D. Majalgaon.